# कृषी विभाग

## जिल्हा अमलबजावणी कक्ष (स्मार्ट)

कार्यालय — प्रकल्प संचालक (आत्मा). कदीमबाग नर्सरी, सिव्हील लाईन, नागपूर-४४०००१
इमेल- nagpur.diu.smart@gmail.com

जावक.क्र/प्र.स/स्मार्ट/नागपूर/ 505/२०२४ दिनांक — ०९.१०.२०२४

**विषय** :- श्री.अरविंद एस. उपरिकर, नोडल अधिकारी, स्मार्ट यांचे **सप्टेंबर-२०२४** महिन्याचे दौरा दैनंदिनी सादर करणेबाबत.

**संदर्भ** : - जा.क्र/स्मार्ट/Dairy/सप्टेंबर/२०२४ दि.०४.१०.२०२४

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, श्री अरविंद सुरेश उपरीकर नोडल अधिकारी स्मार्ट प्रकल्प DIU नागपूर यांचे **माहे सप्टेंबर-२०२४** चे दौरा दैनंदिनी सादर करण्यात आलेले आहे. यापूर्वी ऑगस्ट २०२२ पासून ऑगस्ट -२०२४ पर्यंतचे दौरा दैनंदिनी आपल्या कार्यालयाला सादर कण्यात आलेले असून सर्व मंजूर झालेले आहेत. करिता **सप्टेंबर-२०२४** महिन्याची दौरा दैनंदिनी मंजुर करण्याकरिता सादर करण्यात येत आहे. **सप्टेंबर-२०२४** चे दौरा दैनंदिनी सोबत सहपत्रीत कण्यात येत आहेत. करिता आपल्या अवलोकनार्थ तथा मान्यतेस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर.

प्रमुख,
जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्ष स्मार्ट,
तथा प्रकल्प संचालक आत्मा,नागपूर
**SMART DIU NAGPUR**

श्री अरविंद उपरीकर, उपसंचालक तथा नोडल अधिकारी स्मार्ट प्रकल्प नागपूर यांचे सप्टेंबर-२०२४ ची मासिक दौरा दैनंदिनी -०४/१०/२०२४

| दिनांक | कोठून वेळ | कोठे वेळ | प्रवासाचे साधन | अंतर किमी | दौऱ्याचे विवरण |
|---|---|---|---|---|---|
| 01.09.2024 | --- | ----- | --- | --- | रविवार शासकीय सुट्टी उपभोगली |
| 02.09.2024 | नागपूर 9.45 | नागपूर 18.45 | भाडेकरारावर वाहन | 70 किमी | दक्षिण आफ्रिका आणि दुबईमधील खरेदीदार यांचे नागपूर जिल्ह्यातील संत्रा व मोसंबी उत्पादक शेतकरी उत्पादक कंपनीच्या प्रकल्प ठिकाणी भेट देण्याच्या अनुषंगाने नियोजन करण्यात आले. कार्यालयीन कामकाज केले. |
| 03.09.2024 | --- | ----- | --- | --- | Pola Holliday शासकीय सुट्टी उपभोगली |
| 04.09.2024 | नागपूर 9.45 | नागपूर 19.15 | भाडेकरारावर वाहन | 34 किमी | श्री वानखेडे युनिव्हर्स एक्सपोर्ट या निर्यातदारासोबत नागपूर जिल्ह्यातील संत्रा मोसंबी व मिरची हळद पावडर निर्यात करण्याच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली. कृषी विज्ञान, गुरुदेव व नायरा शेतकरी उत्पादक कंपनी यांचे 5% ऑपरेटिव्ह खर्चाचे बिल काढण्यात आले. |
| 05.09.2024 | नागपूर 9.45 | नागपूर 19.30 | भाडेकरारावर वाहन | 31 किमी | स्मार्ट प्रकल्प कार्यालयामध्ये उपस्थित राहून बाजार जोडणीच्या अनुषंगाने कार्यवाही केली. जय महाकालका शेतकरी उत्पादक कंपनी रामटेक यांना बांधकाम संपादन प्रक्रिया आर्थिक मूल्यमापन अहवाल सादर करणे बाबत नोटीस बजावण्यात आली. अंतरंग उत्पादक कंपनी यांचे राईस मिल मशीन टेंडर प्रक्रिया करणे बाबत कार्यवाही केली.कार्यालयीन कामकाज केले. |
| 06.09.2024 | नागपूर 9.45 | नागपूर 19.45 | भाडेकरारावर वाहन | 40 किमी | रामसगर शेती उत्पादक कंपनी व लोडेश्वर शेतकरी उत्पादक कंपनी यांनी प्रथम बांधकामाच्या रनिंग अकाउंट बिलाचे कपातीच्या रकमा भरला नसल्याबाबत नोटीस बजावण्यात आली. राम सागर शेतकरी उत्पादक कंपनी व जय महाकालका शेतकरी उत्पादक कंपनी रामटेक यांचे महाराष्ट्र प्रदूषण मंडळा कडे ऑनलाइन Noc Concent साठी अर्ज करण्यात आले.कार्यालयीन कामकाज केले. |
| 07.09.2024 | --- | ----- | --- | --- | शनिवार शासकीय सुट्टी उपभोगली. |
| 08.09.2024 | --- | ----- | --- | --- | रविवार शासकीय सुट्टी उपभोगली |
| 09.09.2024 | नागपूर 9.45 | नागपूर 18.30 | भाडेकरारावर वाहन | 69 किमी | स्मार्ट प्रकल्प कार्यालयामध्ये उपस्थित राहून हिंगणा नई दिशा महिला शेतकरी उत्पादक कंपनी यांचे कर्ज मंजुरी व ऑनलाईन मागणी प्रस्ताव लवकर सादर करण्याच्या अनुषंगाने संचालक व पंजाब नॅशनल बँक चे व्यवस्थापक संपन्न कठाणे यांच्याशी पाठपुरावा केला. गुरुदेव शेतकरी उत्पादक कंपनीचे राईस मिल मशीन खरेदीचे टेंडर तांत्रिक अहवाल ओपन करण्यात आले. विभागीय नोडल अधिकारी यांचे कार्यालयात भेट दिली असता स्मार्ट प्रकल्पाचा आढावा दिला. विभागीय अंमलबजावणी कार्यालय स्मार्ट प्रकल्प यांचे मार्फत आयोजित ऑनलाइन बैठकीला उपस्थित राहून CII प्रस्तावाबाबत अद्यावत माहिती दिली.कार्यालयीन कामकाज केले. |
| 10.09.2024 | नागपूर 8.30 | बडेगांव सावनेर,घोटी,नगरधन, हमलापुरी,रामटेक, व परत नागपूर 20.30 | भाडेकरारावर वाहन | 225 किमी | दत्तप्रभू शेतकरी उत्पादक कंपनी व एन बी शेतकरी उत्पादक कंपनी रामटेक यांचे प्रथम अनुदान हप्ता मिळणे बाबत PIU PCMU स्मार्ट प्रकल्प कार्यालय पुणे यांच्याशी पाठपुरावा केला. नागपूर येथील स्मार्ट प्रकल्प अंतर्गत मंजूर असलेल्या व बांधकाम सुरू असलेल्या CBO च्या 1. कृषि विज्ञान शेतकरी उत्पादक कंपनी बडेगांव सावनेर 2. NB fpc घोटी रामटेक 3. Ramsagar FPC भांडारबोडी रामटेक, 4. गुरुदेव शेतकरी उत्पादक कंपनी नगरधन रामटेक 5. मातोश्री FPC हमलापुरी रामटेक यांचे बांधकामास भेट देऊन पाहणी केली. व संचालक मंडळ मध्ये 20% महिला तसेच महिला भागधारक शेतकरी यात किमान 30% करणे, RA बिल सादर करणे, द्वितीय अनुदान मागणी प्रस्ताव सादर करणे. अनुदान मागणी तील त्रुटी पूर्तता करणे, मशीन खरेदी प्रक्रिया सुरू करणे, बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देणे, ताबा पावती करणेबाबत आवश्यक सूचना उपस्थित संचालक यांना दिले आहेत. |
| 11.09.2024 | --- | ----- | --- | --- | Mahalaxmi Local Holliday शासकीय सुट्टी उपभोगली |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 12.09.2024 | नागपूर 9.45 | नागपूर 18.30 | भाडेकरारावर वाहन | 40 किमी | श्री राजेंद्र दुनियादारी संचालक भिवसन पेन शेतकरी उत्पादक कंपनी यांचे बांधकाम व मशीन खरेदीचे टेंडर्स पुणे बाबत जिल्हा कार्यालयात बैठक घेण्यात आले. कनान शेतकरी उत्पादक कंपनी यांचे मंजूर वेट ब्रिज चे खरेदी प्रक्रिया सुरू करणे बाबत संचालकांना सूचना दिल्या. DLCC बैठकीस बचत भवन जिल्हाधिकारी कार्यालय ते उपस्थित राहून बँकेकडे प्रलंबित असलेल्या कर्ज प्रस्तावा बाबत आढावा घेतला. |
| 13.09.2024 | नागपूर 9.45 | नागपूर 18.30 | भाडेकरारावर वाहन | 45 किमी | पारशिवनी सहेली महिला शेतकरी उत्पादक कंपनी यांचे बांधकाम संपादन प्रक्रिया सुरू करणे बाबत संचालक यांना सूचना दिल्या. ACABC ट्रेनिंग कोर्स अंतर्गत स्मार्ट प्रकल्प कार्यालयात भेट देणाऱ्या प्रशिक्षण बॅचला आत्म विभागाच्या व स्मार्ट प्रकल्पाच्या योजनेच्या अनुषंगाने सविस्तर माहिती दिली. |
| 14.09.2024 | --- | ----- | --- | --- | शनिवार शासकीय सुट्टी उपभोगली. |
| 15.09.2024 | --- | ----- | --- | --- | रविवार शासकीय सुट्टी उपभोगली |
| 16.09.2024 | --- | ----- | --- | --- | Eid Holliday शासकीय सुट्टी उपभोगली |
| 17.09.2024 | नागपूर 8.00 | म्हशेपठार मोहपा,जामगाव नरखेड, फेटरी काटोल व परत नागपूर 20.05 | भाडेकरारावर वाहन | 210 किमी | स्मार्ट प्रकल्प कार्यालयामध्ये उपस्थित राहून कार्यालयीन कामकाज केले. विभागीय नोडल अधिकारी श्रीमती प्रज्ञा गोडघाटे यांच्या मार्गदर्शनाखाली नवनंत शेतकरी उत्पादक कंपनी म्हशेपठार मोहपा येथे, लोडेश्वर शेतकरी उत्पादक कंपनी जामगाव नरखेड यांचे संत्रा मोसंबी व भाजीपाला प्रक्रिया युनिट येथे, नाईक ब्रदर कोल स्टोरेज,फेटरी काटोल तसेच सेंद्रिय संत्रा मोसंबी उत्पादक शेतकरी श्री मनोज जवंजाळ यांचे शेतावर भेट देऊन डॉ हिना सुखदेव आंतरराष्ट्रीय खरेदीदार दक्षिण आफ्रिका व व श्री प्रवीण वानखेडे युनिव्हर्स एक्सपोर्ट नागपूर निर्यातदार यांच्यासोबत संत्रा प्रक्रिया उद्योगास भेट देऊन निर्यातीच्या अनुषंगाने व मार्केट लेकीच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली. |
| 18.09.2024 | नागपूर 9.45 | नागपूर व दिल्ली 20.00 | भाडेकरारावर वाहन व रेल्वे | 65 किमी व 1087 किमी | जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर येथील छत्रपती सभागृह येथे स्मार्ट प्रकल्पाच्या अनुषंगाने आढावा बैठक मध्ये उपस्थित राहून स्मार्ट प्रकल्पाची अद्यावत माहिती दिली. सोबतच निर्यातदार व आयातदार यांना नागपूर जिल्ह्यातून संत्रा मोसंबी भाजीपाला व हळद व भिवापुरी मिरची पुरवठा करणे बाबत आवश्यक माहिती दिली. एन बी शेतकरी उत्पादक कंपनी रामटेक यांचे मशीन टेंडर प्रक्रिया सुरू करणे बाबत जिल्हा कार्यालयामध्ये संचालक मंडळ यांची बैठक घेण्यात आली. दिल्ली येथे वर्ल्ड फुड इंडिया साठी रवाना. |
| 19.09.2024 | दिल्ली 8.30 | प्रगती मैदान दिल्ली 20.30 | भाडेकरारावर वाहन | 63 किमी | नवी दिल्ली येथे वर्ल्ड फुड इंडिया मध्ये सहभागी होऊन स्मार्ट प्रकल्पाच्या स्टॉलला भेट दिली तसेच Pmfme महाराष्ट्र राज्य मार्फत उपलब्ध असलेल्या स्टॉलला भेट देऊन माहिती घेतली. सोबतच अन्नप्रक्रिया उद्योगाला मशनरी पुरवठा करणाऱ्या कंपन्यांच्या स्टॉलला भेट देऊन नागपूर जिल्ह्या साठी लागणाऱ्या शेतकऱ्या कंपनीच्या प्रक्रियेसाठी मशीनची माहिती घेतली. |
| 20.09.2024 | दिल्ली 9.00 | प्रगती मैदान नवी दिल्ली 22.00 | भाडेकरारावर वाहन व रेल्वे | 44 किमी | वर्ड फुड इंडिया नवी दिल्ली प्रगती मैदान येथे उपस्थित राहून आंतरराष्ट्रीय खरेदीदारांसोबत नागपूर जिल्ह्यातील प्रक्रियायुक्त पदार्थ व GI असलेला संत्रा व मिरचीचे प्रक्रिया पदार्थ पुरवठा करणे बाबत दक्षिण आफ्रिका वुमन सौदी अरेबिया ऑस्ट्रेलिया व जपान या देशाच्या खरेदीदारासोबत बैठक घेतली. नागपूरकरिता रवाना |
| 21.09.2024 | दिल्ली 1.00 | नागपूर 15.30 | रेल्वे | 1087 किमी | नागपूर पोहोच व शनिवार शासकीय सुट्टी उपभोगली. |
| 22.09.2024 | --- | ----- | --- | --- | रविवार शासकीय सुट्टी उपभोगली |
| 23.08.2024 | नागपूर 9.45 | नागपूर 18.30 | भाडेकरारावर वाहन | 43 किमी | स्मार्ट प्रकल्प कार्यालय मध्ये रा,हू जिल्हा कार्यालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांची बैठक घेतली. वर्ड फुड इंडिया मध्ये घेतलेल्या प्रक्रिया युनिव्हर्स साठी लागणाऱ्या मशीन, पॅकेजिंग मटेरियल, निर्यातीची क्षमता, व बाजार जोडणी साठी आवश्यक असलेल्या बाबी सोबतच Trade India, India Mart, ONDC, Market Mirchi या ऑनलाइन मार्केट प्लॅटफॉर्म बद्दल DIU कार्यालयातील संबंधित अधिकारी कर्मचारी यांना माहिती दिली. भीमसेन पेन शेतकरी उत्पादक कंपनी यांचे बांधकामाच्या Pre Bid Meeting घेण्यात आली. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 24.08.2024 | नागपूर 9.45 | नागपूर 18.30 | भाडेकरारावर वाहन | 45 किमी | गुरुदेव क्षेत्र उत्पादक कंपनी यांच्या द्वितीय अनुदान मागणी मधील त्रुटीपुर्तता करणेबाबत स्मारक पत्र देण्यात आले. RBI नागपूर कार्यालयाच्या संयुक्त विद्यमानाने वृक्षारोपण कार्यक्रम व सायबर क्राईम जनजागृती कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. |
| 25.08.2024 | नागपूर 8.30 | एमआयडीसी उमरेड,मांडळ,चाफेगडी कुही व परत नागपूर 20.30 | भाडेकरारावर वाहन | 167 किमी | मानकायमाता शेतकरी उत्पादक कंपनी चिखलापार भिवापूर यांचे एमआयडीसी उमरेड येथे भाडेतत्त्वावर घेतलेल्या जागेवर वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला व सायबर क्राईम व स्मार्ट प्रकल्पाच्या अंतर्गत प्रक्रियेत असलेल्या दालमिल प्रकल्पाविषयी उपस्थित संचालक व भागधारकांना माहिती दिली. कृषी पूरक शेतकरी उत्पादक कंपनी मांडळ यांचे वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित राहून स्मार्ट प्रकल्प व प्रक्रिया उद्योगाच्या अनुषंगाने योजनेबद्दल सविस्तर माहिती उपस्थित भागीधारकांना दिली. मुंडलेसन शेतकरी उत्पादक कंपनी चाफेगडी तालुका कुही यांचे स्मार्ट प्रकल्पांतर्गत प्रस्तावित प्रकल्पाच्या ठिकाणी वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला सोबतच वित्तीय सुरक्षा व सायबर क्राईम आणि ड्रोन फवारणीचे प्रात्यक्षिक देण्यात आले. |
| 26.09.2024 | नागपूर 9.40 | नागपूर 19.40 | भाडेकरारावर वाहन | 68 किमी | DIU स्मार्ट प्रकल्प कार्यालयामध्ये उपस्थित राहून समुदाय आधारित संस्थेला प्रकल्पाच्या अनुषंगाने आवश्यक असलेले परवानगी घेणेबाबत पत्र देण्यात आले. रामिती नागपूर येथे जोखीम निवारणबाबत आयोजित कार्यशाळेला भेट देऊन उपस्थित संचालकांना मार्गदर्शन केले. |
| 27.09.2024 | नागपूर 9.30 | नागपूर 19.50 | भाडेकरारावर वाहन | 51 किमी | कार्यालयात उपस्थित राहून कार्यालयीन कामकाज केले. विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयात उपस्थित राहून नवीन JDA म्हणून रुजू झालेल्या श्री उमेश घाडगे सर यांचे भेट घेऊन स्मार्ट प्रकल्पाच्या अनुषंगाने चर्चा केली. IDBI बँक गोधनी येथे भेट देऊन दत्तप्रभू शेतकरी उत्पादक कंपनी यांच्या पहिल्या RA बिलाच्या निधी वितरण बाबत श्री विशाल कॉन्ट्रॅक्टर मॅनेजर यांना माहिती दिली. कार्यालयीन कामकाजाच्या अनुषंगाने कृषी महाविद्यालय नागपूर येथे भेट दिली |
| 28.09.2024 | --- | ----- | --- | --- | शनिवार शासकीय सुट्टी उपभोगली. |
| 29.09.2024 | --- | ----- | --- | --- | रविवार शासकीय सुट्टी उपभोगली |
| 30.09.2024 | नागपूर 9.40 | नागपूर 19.40 | भाडेकरारावर वाहन | 46 किमी | जिल्हा अंमलबजावणी कक्ष कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यांची बैठक घेऊन मंजूर असलेल्या 13 समुदाय संस्थेच्या प्रलंबित कामाबाबत आढावा घेऊन प्रलंबित कामे त्वरित करण्याच्या सूचना दिल्या. दत्तप्रभू शेतकरी उत्पादक कंपनी यांचे पहिल्या अनुदान हप्त्यातील दुसरा भाग मागण्याच्या अनुषंगाने अनुदान मागणी प्रस्ताव सादर करण्यात आला. RIU कार्यालय मार्फत आयोजित आढाव सभेस ऑनलाईन उपस्थित राहून नागपूर जिल्ह्याचा आढावा दिला |

**माहे सप्टेंबर 2024 चा गोषवारा**

| | | |
|---|---|---|
| 1 | फिरतीचे एकुण दिवस | 5 |
| 2 | कार्यालयीन कामाचे दिवस | 13 |
| 3 | रजेचे दिवस | 0 |
| 4 | शासकीय सुट्टीचे दिवस | 12 |
| 5 | प्रशिक्षणा चे दिवस | 0 |
| 6 | महिन्याचे एकुण दिवस | 30 |

**अरविंद उपरीकर**
**नोडल अधिकारी स्मार्ट DIU कक्ष नागपूर**

नोडल अधिकारी
डी.आय.यु., स्मार्ट प्रकल्प
नागपूर

**मा. प्रमुख जिल्हा अंमलबजावणी कक्ष स्मार्ट,**
**तथा प्रकल्प संचालक आत्मा नागपूर**

SMART DIU NAGPUR